संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७९/२०२३
नि.क्रं. २२/सी

**सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ शपथेवर कथन करतो की-**

माझे नाव - विनोद विश्वनाथ पाटील
वय - ३७ वर्षे, व्यवसाय- शेती
राहणार - क. तारळे ता:राधानगरी , जि: कोल्हापूर

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** विद्या विश्वनाथ पाटील ही माझी आई आहे. दि. १९/०३/२०२३ रोजी विठ्ठलाई देवी दुर्गमानवड येथील यात्रा होती. सदरील दिवशी रात्री ९.०० वा.चे सुमारास माझी आई घरातुन दुकानात सामान आणणेकरीता गेली होती. सदरील वेळी दोन मोटर सायकलस्वार यांनी मागुन येवून आईला धडक दिली. सदरील वेळी मला आईचे ओरडणेचा आवाज आला. आवाज ऐकून मी, माझा लहान भाऊ शेखर आणि त्याचा मित्र संदीप असे घराबाहेर आलो. तेव्हा बाहेर येवून पाहिले असता माझी आई रस्त्याचे कडेला पडलेली दिसून आली. सदरील ठिकाणी मोटर सायकलस्वार देखील पडलेले दिसून आले. मी आणि संदीपने आईकडे जावून पाहिले असता तिचे उजव्या पायात आणि उजव्या हातात कळा मारत होत्या. दोन्ही मोटर सायकलस्वाराकडे चौकशी केली असता मोटर सायकल निवृत्ती पाटील हा चालवत असल्याचे आणि अस्लम मुल्लाणी हा मोटर सायकल मालक असल्याचे कळून आले. घटनास्थळावरून आरोपी क्र. २ अस्लम पळून गेला. पळून जाण्यापुर्वी आरोपी क्र. २ ने माझे आईचे वैद्यकीय खर्च देईल असे सांगितले होते.

**२.** त्याच रात्री आम्ही आमचे आईला कोल्हापूर येथील किरण दोशी यांचे

दवाखान्यात ॲडमीट केले. तेथे उपचारा दरम्यान माझे आईचे उजव्या मांडीचे हाड आणि उजव्या मनगठाचे हाड फ्रक्चर झालेचे समजले. यानंतर माझे भावाने आरोपी क्र.२ ला फोन करुन सदरील खर्च देण्याबाबत विचारणा केली. परंतू आरोपी क्र. २ ने खर्च देण्यास नकार दर्शविला.

**३.** दि. २१ मार्च २०२३ रोजी घडले प्रकाराची मी राधानगरी पोलीस ठाणेत फिर्याद दिली. ती आता मला दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.२३/PW1** देण्यात येते. आता मला ऑनलाईन प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.२४/PW1** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. साक्षीदाराने बोट दाखवून आरोपी क्र.१ व आरोपी क्र.२ ची ओळख पटवली.

**उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ वकील श्री. व्ही. बी. पाटील यांचे मार्फत -**

**४.** हे म्हणणे खरे नाही की, दि.१९/०३/२०२३ रोजीच कसबा तारळे येथील देखील यात्रा होती. माझा भाऊ कसबा तारळेच्या यात्रेकरीता घरी दोन दिवसाकरीता आला होता. हे म्हणणे खरे आहे की, यात्रे दिवशी पाहुण्याकरीता जेवण असते. माझा भावाचा मित्र संदीप हा सदरील दिवशी जेवणाकरीता आला होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की दुस-या दिवशी रविवार असल्याने मित्र संदीप दि. १९ ला हा जेवणाकरीता आला होता. सदरील दिवशी माझा भाऊ व त्याचा मित्र संदीप हे कोल्हापूरवरुन एकत्र आले होते. माझा भाऊ व त्याचा मित्र संदीप ८.३० वा. चे सुमारास येवून घटनेपुर्वी जेवून बसले होते. माझी आई ९.०० वा. चे सुमारास घराबाहेर पितांबरी आणणेकरीता गेली होती.

**५.** मी पोलीसांना जबाब देतेवेळी आईचा अवाज ऐकून आम्ही तिघे घराबाहेर

आलो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघात प्रत्यक्षपणे पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोटर सायकलने पाटीमागून येवून आईला धडक दिली आणि आई पडली ही घटना मी प्रत्यक्षपणे पाहिलेली नाही. सदरील मोटर सायकलचा क्रमांक MH09-FG-3776 असा होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे दुर्गमानवड चौकाच्या हाकेच्या अंतरावर आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की माझे घराशेजारीच आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गमानवाडच्या यात्रेला दरवर्षी २ ते ३ लाख भावीक येतात. हे म्हणणे खरे आहे की, तारळे ते दुर्गमानवाड जाणा-या चौकात गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, सदरील रस्त्यावर सदरील वेळी खड्डे होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी सदरील ठिकाणी गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, मोटर सायकल कोण चालवत होते हे मी प्रत्यक्षपणे पाहिलेले नाही. मी घटनास्थळी अंदाजे अर्धा तास होतो.

७. सदरील वेळी माझी आई संतोष शिवुडकर यांचे दुकानात चालली होती. संतोषचे दुकान हे दुर्गमानवड ते तारळे रस्त्याच्या उजव्या बाजूस आहे. घटनेच्यावेळी आई दुकानात जात होती. आई घरातुन ९.०० वा. चे सुमारास निघाली होती. सदरील दुकान आणि आमचे घरात अंदाजे १०० ते १५० मीटरचे अंतर आहे. घटनास्थळ आणि आमचे घर यामध्ये १० मीनीटाचे अंतर आहे.

८. माझा भाऊ याचेकडे आरोपी क्र. २ अस्लम याचा मोबाईल क्रमांक होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आईला कोल्हापूर येथे दवाखान्यात घेवून गेलो त्यावेळेस दोन्ही आरोपी घटनास्थळी गाडी शेजारीच होते. जेव्हा आरोपी क्र. २ ने मला माझे आईचे वैद्यकीय खर्च देतो असे सांगितले त्यावेळेस आरोपी क्र.१ तिथे उपस्थीत नव्हता. घटनास्थळावरुन कोल्हापूर येथील दवाखान्यात आम्ही आईला माझे भावाची वॅगेनार या

कार मधून घेवुन गेलो. दवाखान्यात गेलो तेव्हा डॉक्टर हजर होते. जाण्यापुर्वी मित्र संदीपने दवाखान्यात फोन करुन डॉक्टर असलेबाबत विचारणा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील घटनेपुर्वी माझ्या आईचा पायाचा उपचार सुरू होता. साक्षीदार आता सांगतो की उपचार सुरू नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या रात्री आम्ही आरोपी क्र. २ कडे फोन करून रुपये १,७५,०००/- ची मागणी केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ने वर नमूद रक्कम देण्यास नकार दिला म्हणून मी ही फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईचे पुर्वीच उपचार सुरू होते आणि त्याचा खर्च काढण्याकरीता आरोपीला लुबाडण्याच्या हेतूने मी त्यांचे विरुध्द खोटी तक्रार देवून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

राधानगरी (एन. पी. काकडे)

दिनांक.२१/११/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.